# सिंधूताई सपकाळ यांना ताराराणी पुरस्कार जाहीर

कोल्हापूर, ता. ५ : येथील ताराराणी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा 'भद्रकाली ताराराणी द्वैवार्षिक पुरस्कार' समाजसेविका सौ. सिंधूताई सपकाळ यांना जाहीर झाला आहे.

एकवीस हजार रुपये, छत्रपती महाराणी ताराराणी स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ व मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. सौ. सपकाळ आदिवासी, उपेक्षित, निराधार लोकांसाठी कार्य करतात. सोमवारी (ता. १०) दुपारी चार वाजता पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या हस्ते ताराराणी विद्यापीठाच्या प्रांगणात पुरस्कार वितरण होईल. ही माहिती संस्थेचे सचिव, प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

दै. सकाळ ६/२/०३